# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०२/०५/२०१८**

**(दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)**

**प्रकरण क्र. १५ :- दिव्यांगासाठी कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणे.**

ठराव क्र. :- १६

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगासाठी कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणे व दिव्यांग मतिमंद विदयार्थ्यांकरीता शाळा सुरू करणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत दि.०८/११/२०१७ रोजी मा. महासभा प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ नुसार दिव्यांग कल्याणकारी समिती गठीत करणेबाबत निर्णय घेण्यात आला होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार दि.२७/११/२०१७ व दि.२१/०३/२०१८ रोजी दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे मा. महापौर, मा. उप-महापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता तसेच उप-आयुक्त व विभागप्रमुख यांच्या समवेत मा. महापौर यांचे दालन, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिव्यांग व्यक्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनामध्ये खालीलप्रमाणे धोरण ठरविणेत आले.

**१) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १५ वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसिलदाराकडुन)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त दिव्यांग धारकांसाठी असेल.<br>२) दिव्यांग व्यक्तींने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे समंतीपत्र घेणे बंधनकारक आहे.<br>३) १८ वर्षावरील सज्ञान दिव्यांगाला स्टॉल परवाना दिला जाईल.<br>४) मा. महासभा ठराव क्र. ३४ दि.०३/०८/२००४ मधील अटीशर्ती नुसार ४x६ चौ. फुटावरच दिव्यांगाना स्टॉल परवाना देण्यात |

सत्य प्रत

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

येईल. ४x६ चौ.फुटापैक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून दिव्यांगाचा स्टॉल परवाना रद्द करुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

५) ज्या व्यक्तीला ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्याप्रमाणे वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकाचा स्टॉल जप्त करुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल.

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, परवाना विभाग, प्रभाग अधिकारी यांचेकडुन प्रभागनिहाय जागा निश्चीती नंतर स्टॉल दिला जाईल दर ३ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.

७) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना प्राधान्यांने स्टॉल परवाना दिला जाईल व उर्वरीत दिव्यांग अर्जधारकांना स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनुसार अर्जाचा विचार केला जाईल.

८) दिव्यांग स्टॉलधारकाचे परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पध्दतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.

९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा त्या ठिकाणी योग्य जागा नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.

१०) दिव्यांगाना दिलेले स्टॉल भाडयाने देता अथवा घेता येणार नाहीत. तसेच या स्टॉलव्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, असे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील. परवाना दाखल्यावर स्टॉलधारकांचा फोटो लावून तो परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना रद्द करण्यास माझी हरकत नाही, असे शपथ देणे बंधनकारक राहील.

११) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सुचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना केली जाईल

१२) सद्यस्थितीत दिव्यागांना परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा हा व्यवसाय कालबाहय झाला असल्याने टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणाऱ्या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी,

सत्य प्रत



नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणाऱ्या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. दिव्यांग कल्याण समितीने सुचविलेले व्यवसाय इ. स्टॉल धारकास स्टॉल मध्ये ठेवता येतील.

१३) तंबाखुजन्य पदार्थ व ज्वलनशील वायुवर (गॅस किंवा स्टोव्ह) निर्माण करण्यात येणाऱ्या पदार्थांची विक्री करता येणार नाही.

१४) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल बाबत वादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास समितीचा निर्णय अंतीम राहील.

१५) दिव्यांग व्यक्तींना स्टॉलची तोडफोड अथवा हानी झाल्यास व्यक्तीश: जबाबदार धरुन त्यांचेकडुन नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

१६) शासन/मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बदल करण्यात येतील.

**इतर अटीशर्ती :-**

१) बी.पी.रोड, नवघर स्टेशन ते नवघर रोड, फाटक ते केबिन रोड, ६० फुट रोड भाईंदर (प.), भाईंदर (प.) स्टेशन रोड ते सेंकडरी शाळा, भाजी मार्केट ते कमला पार्क पोलिस स्टेशन, सब वे रोड ते पोलिस स्टेशन, मिरा रोड रेल्व स्टेशन ते रसाज, वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हॉटेल इतर ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.

३) धार्मिक स्थळ, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन,इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नये.

४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या दिव्यांग व्यक्तींना स्टॉल दिलेला आहे. अशा दिव्यांग व्यक्तींना ६० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

५) एका जागेसाठी दोन दिव्यांग व्यक्तींनी अर्ज केलेला असल्यास त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी व त्याचे शहरातील वास्तव्य किती वर्षाचे आहे, यावर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६) स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वत:ची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमीपत्र दयावे.

७) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन विशेष बाब म्हणुन स्टॉल परवानगी देण्यात येईल.

सत्य प्रत

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

८) दिव्यांगाना स्टॉल वितरण महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

९) सदर स्टॉलधारकांना आर्थिक मदत करणेबाबतचा निर्णय मा. अपंग कल्याण समिती घेईल.

१०) पुर्वी दिलेले सर्व बुथ परवाने रद्द करण्यात येतील व बांधकामे केलेली असल्यास तोडण्यात येतील.

२) **योजनेचे नांव :-** शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये दिव्यांग व्यक्ती कार्यरत असावी.

२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)

२) महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.

३) आधार कार्डची छायांकित प्रत.

### ३) दिव्यांग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षे वास्तव्य असल्याचा
दाखला. लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत व इतर कागदपत्रे

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकाची सत्यपत्र

५) आधार कार्डची छायांकित प्रत.

### ४) दिव्यांगव्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे –

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग,

सत्य प्रत



नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधने पुरवून त्यांना स्वावलंबी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)

३) आधार कार्डची छायांकित प्रत

५) **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक फी देणे.**

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| नर्सरी ते ४ | २५०० | ५,०००/- |
| ५ ते ७ | ४००० | ६,०००/- |
| ८ ते १० | ६००० | ८,०००/- |
| ११ ते १२ | ८००० | १०,०००/- |
| १२ ते पदवी (कला, वाणिज्य, विज्ञान) | १०,००० | १२,०००/- |
| १२ ते पदवी (तांत्रिक,विज्ञान, इतर IT व्यावसायिक) | - | २०,०००/- |

**योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटल) सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकेची सत्यप्रत.

५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.

सत्य प्रत

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे कडून शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.

७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.

८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

९) बँक पासबुकची छायांकित प्रत.

१०) आधार कार्डची छायांकित प्रत.

**६) दिव्यांग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –**

**योजनेचा उद्देश –** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला) दाखला

२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.

३) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.

४) आधार कार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत.

५) २ लाखाच्या मंजुर रक्कमेवर ५० टक्के अनुदान राहील व अनुदानाची जास्तीत जास्त रक्कम रु.१ लाख पर्यंतची असेल.

६) नियमित ६ महिनेचे कर्जांचे हफ्ते भरण्यात आलेले असल्याबाबतचे बँकेकडुन पत्र प्राप्त झाल्यानंतर अनुदानाची रक्कम त्यांच्या खाती बँकेत वर्ग करण्यात येईल.

**७) दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

सत्य प्रत

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेल्या साहित्या साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे)

**साहित्य :-** शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला) दाखला

२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन पॅनकार्ड, रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.

३) आधार कार्डची छायांकित प्रत.

४) शिधापत्रिकेची छायांकित प्रत

५) सदर योजना एक वर्षापर्यंत राहील व मुदतवाढीचा निर्णय समिती घेईल.

**८) दिव्यांग व्यक्तीसाठी क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

**९) दिव्यांगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे :-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.२५,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम

सत्य प्रत

नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे. (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)

२) दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.

३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी या दोन्ही बाबतीत प्रतिज्ञापत्र दयावे.

४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

६) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.

आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत.

**१०) दिव्यांग मुलांसाठी शाळा:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग मुलांसाठी शाळा

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| **योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** | सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या दिव्यांग मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत. |

१) मुख्याध्यापक - ०१
२) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार
३) शिक्षक - आवश्यकतेनुसार
४) लिपिक - आवश्यकतेनुसार
५) दिव्यांग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार
६) शिपाई - आवश्यकतेनुसार

**११) दिव्यांग व्यक्तींचे सर्व्हेक्षण करणे:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| | दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत. |

तरी सदर धोरण मा. महासभा दि.०८/११/२०१७ प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ यानुसार ठरविण्यांत आलेल्या समितीमार्फत दिव्यांगासाठी योजनांचे धोरण निश्चित करण्यात आलेले असुन सदरचे धोरण मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव क्र :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

***सुचक :-*** गणेश गजानन भोईर ***अनुमोदक :-*** श्री. पंकज पांडेय

***ठराव सर्वानुमते मंजुर***

***ठराव वाचून कायम करण्यात आला***

**महापौर**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

H:\18-04-2018 tahkub 02-05-18\ok tharav\prakaran 15ok.doc